# -अधिसुचना-

क्र.अ.का./भु.स./प्र.अ./कवि-५९५-/२०२१
जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.
दिनांक:- ०६/०८/२०२१

१) ज्या अर्थी शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस-२८९२/११८०/सीआर-९०-९२(बी)/नवि-१३,दि. ०४.१२.१९९२ अन्वये मंजुर झाली असुन ती दि. २५.०२.१९९३ ला अमलात आली आहे. आणि ज्या अर्थी उक्त विकास योजनेत चमन नगर मधुन जाणारा व आरक्षण क्र. ३०७ "बगीचा", आरक्षण क्र. ३०६ "सिटी बस स्टॅंड" च्या दक्षिण हद्दीवरुन ६०.०० मिटर रुंद अकोली वळन रस्ता ( यापुढे "उक्त रस्ता असे उल्लेखिलेला) प्रस्तावित आहे.

२) आणि ज्या अर्थी अमरावती महानगरपालीकेने तिच्या सर्व साधारण सभेच्या ठराव क्र. ९, दि. २० सप्टेम्बर २००५ अन्वये उक्त रस्ताची, आरक्षण क्र. ३०७ पासुन पुर्वे कडे आणखी बदलुन ती आरक्षण क्र.३०७ "बगीचा, आरक्षण क्र. ३०६ " सिटी बस स्टॅंड" व आरक्षण क्र. ४०५ "टाउन सब सेंटर" मधुन प्रस्तावित करण्याचे व यामुळे मुक्त होणारे क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ट करण्याचे ठरवुन तिचे पत्र क्र. अमनपा/ससनर/आयुक्त/फेरबदल/४२०/०६, दि.०४.०२.२००६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नीयोजन व नगर रचना अधिनियम,१९६६(महाराष्ट्र १९६६ चा ३७ वा) ( यापुढे "उक्त रस्ता असे उल्लेखिलेला) चे कलम-३७ च्या उपकलम (१) अन्वये फेरबदालाचा प्रस्तव (यापुढे "उक्त फेरबदल प्रस्ताव" असे उल्लेखिलेला) आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास मंजुरीसाठी सादर केला आहे.

३) त्या अर्थी उक्त अधिनियमांचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या ईतर अधिकाराचावापर करुन उक्त विकास योजनेतील फेरबदल प्रस्तावास शासन सशर्त वा बदलासह मंजुरी देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दि. ०४.१२.१९९३ ची विकास योजना मंजुरीची अधिसुचना सुधारीत करण्यात येत आहे.

४) आणि ज्या अर्थी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन परीपत्रक क्र.टीपीबी-४३८५/२७७५-अ/नवि-५,मंत्रालय, मुंबई-४०००३२. दि. २५ मार्च १९८६, च्या भुसंपादन अधिनियम १८९४ व भुसंपादन (सुधारीत) अधिनियम १९८४ च्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अन्वये भुसंपादनाची कार्यवाही करण्यात येते .जेव्हा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ कलम १२६(२) व (४) अन्वये भुसंपादनाची कार्यवाही करण्यात येते तेव्हा भुसंपादन अधिनियम १८९४ अन्वये काढण्यात येणारी कलम ४(१) ची प्राथमिक अधिसुचना काढण्याची तरतुद नाही. परतु भुसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ६ च्या तरतुदी नुसार करण्यात येणारी तत्सम घोषणा कलम १२६(२) व (४) खाली काढल्या जात असुन भुसंपादना बाबतची पुढील सर्व कार्यवाही मात्र भुसंपादन अधिनियम १८९४ मधिल तरतुदी नुसार होते.

५) आणि ज्या अर्थी सहा.संचालक नगर रचना, महानगरपालीका अमरावती यांनी माहराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायदा १९६६ चे कलम १२६ मधिल पोट कलम (२) अन्वये मा. जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडे अर्ज सादर केलेला आहे ( ज्यात उक्त महाराष्ट्र कायदा) आणि मौजा चमन नगर येथील आरक्षण क्र.४०५ क्षेत्रफळ १४५०१.९४ चौ. मि. संपादीत करण्याची मागणी केली आहे. (भुसंपादन अधिनियम १८९४)

६) आणि ज्याअर्थी शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस-२८९२/११८०/सीआर-९०-९२(बी)/नवि-१३,दि. ०४.१२.१९९२ अन्वये मंजुर झाली असुन ती दि. २५.०२.१९९३ ला अमलात आली आहे. आणि एम. आर. टी. पी. कायदा १९६६ चे कलम ३१ मधिल पोट कलम (१) ( महाराष्ट्र कायदा क्र. ३७/१९६६)अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायद्याचे कलम १५१ मधिल पोट कलम (१)

अन्वये शासनाने शक्ती प्रदान करुन उक्त कायद्यातील कलम १२६ मधिल पोट कलम (१)(२) आणि (४) अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना शक्ती प्रदान करण्यत आली आहे.

७) आणि ज्या अर्थी जिल्हाधिकारी, अमरावती यांची उक्त जमीन सार्वजनीक उपयोगाकरीता आवश्यक असल्याचे समाधान झाले असल्याने आणी उक्त जमीनीची निवाड्यानुसार येणारी पुर्ण रक्कम आयुक्त, महानगरपालीका , अमरावती यांनी अदा करावयाची आहे.

८) आणि म्हणुन महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना कायद्याचे कलम १२६ चे पोट कलम (४) अन्वये तसेच भुसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ६ अन्वये शक्ती प्रदान केलेले आहेत.

९) शासनाचे नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस-२८९२/११८०/सीआर-९०-९२(बी)/नवि-१३,दि. ०४.१२.१९९२ अन्वये मंजुर झाली असुन ती दि. २५.०२.१९९३ ला अमलात आली आहे. आणि एम. आर. टी. पी. कायदा १९६६ चे कलम ३१ मधिल पोट कलम (१) ( महाराष्ट्र कायदा क्र. ३७/१९६६)अन्वये जिल्हाधिकारी ,अमरावती यांनी मौजा बडनेरा (चमन नगर) येथील उक्त जमीन मंजुर विकास योजणे मध्ये मौजा चमन नगर येथील आरक्षण क्र.४०५ क्षेत्रफळ १४५०१.९४ चौ. मि. संपादीत करण्याची मागणी केली आहे. (भुसंपादन अधिनियम १८९४) आवश्यक असल्याची घोषना केली आहे.

१०) उक्त जमीनीच्या संबंधात या पुढे करावयाच्या सर्व कार्यवाही मा. जिल्हाधिकारी यांची कामे पार पाडण्यासाठी भुसंपादन अधिनियमांच्या कलम ३ खंड(क) अन्वये या व्दारे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, अमरावती यांची नेमणुक करण्यात येत आहे.त्याच प्रमाणे त्यांची उक्त जमीनीच्या संबधातील संपादनाची कार्यवाही आवश्यक त्या सर्व व्यवस्था करावी असे निर्देष देण्यात येत आहे.

११) उक्त जमीनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथ भुसंपादन अधिकारी अमरावती यांचे कार्यालयात पाहणी करीता उपलब्ध आहे.

## अनुसुची

| जिल्हा तालुका गाव | भुमापन क्र./सर्वे न./सि.क्र./ प्लॉट क्र. | गाव नमुना ७/१२ प्रमाणे जमीनीचे क्षेत्रफळ | आवश्यक असलेले (संपादीत करावयाचे ) अंदाजीत जमीनीचे क्षेत्र( चौ. मि.) | भुसंपादन कार्यलयाचे नाव व भुसंपादन प्रंकरण क्र. | संपादनाचा उद्येश | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| बडनेरा ता. जि. अमरावती | २८०,<br>३४०/४,<br>३४१ | ३५०० चौ.मि.<br>८१०० चौ.मि.<br>३०२०० चौ.मि. | ८२५<br>२२७६<br>११४००.९४ | उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, अमरावती प्रकरण क्र. ०३/४७/२०१८-१९ | आरक्षण क्र. ४०५ (अकोली वळन रस्ता मौजा बडनेरा,(चमन नगर) | |
| | | एकुण | १४५०१.९४ | | | |

उप विभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी
अमरावती

जिल्हाधिकारी
अमरावती